# प्रमाण पत्र

श्रीमती. हिप्परगे व्ही.के. यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली "उत्तर सोलापूर तालुका साक्षरता अभियानात प्राथमिक शिक्षिकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करून त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे". या विषयावर **एम्.फिल.[शिक्षणशास्त्र]** या पदवीसाठी संशोधन अहवाल सादर केला आहे. सदरहू कार्य कोठेही प्रसिध्द केलेले नाही.

<u>संशोधन विषय</u>:-"उत्तर सोलापूर तालुका साक्षरता अभियानात प्राथमिक शिक्षिकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करून त्याची परिणामकारकता वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे."

<u>विद्याशाखा</u> : शिक्षणशास्त्र विद्याशाखा [TEACHER EDUCATION]

<u>संशोधन केंद्र</u> : कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,सोलापूर-४१३००६.

<u>दिनांक</u> : 14/6/99

<u>स्थळ</u> : सोलापूर

Pathan. N.B.

**डॉ.नसीम पठाण (प्रपाठक)**
कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,
सोलापूर - ६.

# प्रमाण पत्र

श्रीमती. हिप्परगे व्ही.के. यांनी कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या संशोधन केंद्रातून एम्.फिल्. या पदवीसाठी "उत्तर सोलापूर तालुका साक्षरता अभियानात प्राथमिक शिक्षिकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करून त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे." या विषयावर डॉ.नसीम पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण करून शिवाजी विद्यापीठास सादर करण्यात येत आहे.

डॉ.नसीम पठाण (प्रपाठक)
मार्गदर्शक
कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,
अशोक चौक, सोलापूर- ६.

डॉ.विनायक रा. भितांडे
प्राचार्य
कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,
अशोक चौक, सोलापूर- ६.

# ऋणनिर्देश

गरजेमधूनच मानवाचे जीवन साकार होते. जीवनाला आकार येतो. अन्न,वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. या सर्व गरजांमध्ये शैक्षणिक गरजा महत्वाच्या आहेत. समाजातील प्रत्येकाने शिक्षण घेणे ही काळाची गरज बनली आहे. कोणतेही शिक्षण व त्याचे स्वरूप काळानूसार असते. शिक्षण हे स्वतःचा विकास, समाज बांधणीचा उल्हास व त्यातूनच उज्वल राष्ट्राचा इतिहास घडत असतो म्हणून शिक्षण ही संजीवनी आहे. 1991 च्या जनगणनेनुसार आपल्या भारताची लोकसंख्या 84.39 कोटी असून देशातील लोकांचे साक्षरता प्रमाण 52.11 टक्के आहे. बाकीचे राहिलेले निरक्षर आहेत. त्यामुळे साक्षरता प्रसार ही काळाची राष्ट्रीय गरज आहे. म्हणून उत्तर सोलापूर तालुक्यातून साक्षरता अभियान मोहिम राबविण्यात येत आहे.

विशेषतः या साक्षरता चळवळीचा भार शासनाने प्रामुख्याने प्राथनिक शिक्षकांवर सोपविलेला आहे. या चळवळीत सहभागी होताना शिक्षिकांना ब–याच समस्या आल्या त्या समस्यांची माहिती मिळविण्यासाठी सदरहू संशोधन समस्या निवडली आहे.

कस्तूरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर येथील प्रपाठक डॉ. नसीम पठाण यांचे प्रस्तुत संशोधनाच्या संबंधी, विषय निश्चितीपासून ते कार्य पूर्ण होईपर्यंत मिळालेले सहकार्य व मार्गदर्शन तसेच त्यांनी संशोधनासाठी दिलेली प्रेरणा यामूळेच मला हा प्रबंध एम.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास सादर करण्याची संधी मिळाली आहे. त्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक , गटशिक्षणाधिकारी यांनी बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची ही मनःपूर्वक आभारी आहे.

संशोधनासाठी संदर्भ गंथ, नियतकालिके व इतर साहित्य वेळोवेळी उपलब्ध करून दिल्यामळे मला ही सर्व माहिती मुद्‌देसूद व व्यवस्थित मांडता आली त्याबद्‌दल ग्रंथपाल श्री. सावंजी यांचे मी आभार मानते. मी ज्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनायक भिंताडे, मार्गदर्शक डॉ. नसीम पठाण व प्राध्यापक वर्ग यांच्याही मार्गदर्शनाचा लाभ मिळाला त्यांचेही मनःपूर्वक ऋण व्यक्त करते.

संशोधन काळातील सर्व प्रकारचे टंकलेखन, चक्रमुद्रण अतिशय तत्परतेने व अचूक करून दिल्याबद्‌दल श्री. सचिन शट्‌टी यांचे मी आभार मानते. शिवाय ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य केले आहे त्यांचेही आभार मानतो.

सोलापूर –

दिनांक – २९/६/९९ .

वसुधा कल्याणराव हिप्परगे